# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 07/08/2020 (शु क्रवार)
(दुपार)

---

### शारीरिक व मानसिक छळ करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो. स्टे. उमरेड :– अंतर्गत प्लॉट क्र. 14 शिक्षक कॉलनी उमरेड येथे दि. 02/05/2020 चे पुर्वी फिर्यादींची बहीण नामे– सौ. दिपमाला प्रभात झोडे(मृतक), वय 38 वर्ष व आरोपी नामे– प्रभात दिनकराव झोडे, वय 44 वर्ष, रा. प्लॉट क्र. 14 शिक्षक कॉलनी उमरेड हे दोघेही पतीपत्नी आहेत. या दोघांचे सन 2005 मध्ये रितीरिवाजा प्रमाणे लग्न झाले होते. यानंतर ऑक्टोबर–2018 मध्ये सौ दिपमाला झोडे यांना कर्क रोग असल्याचे निदान होवुन शस्त्रक्रिया झाली होती. डॉक्टरने किमान 1 वर्ष बेडरेस्टचा सल्ला दिला असुन तिचा पती आरोपी प्रभात झोडे हा तिच्या इच्छे विरूद्ध अश्लिल विडीयो दाखवुन बळजबरीने शारीरिक संबंध प्रस्थापित करित होता. शारीरिक संबंधासाठी मारहाण करून ढक्कले त्यामुळे तिच्या मनक्याचे हाड तुटले पतीच्या सदर त्रासाला कंटाळुन दिपमाला झोडे हिने दि. 01/06/2020 रोजी पासुन नागपुर येथे वडिलांच्या घरी आली आहे. अशाप्रकारे फिर्यादीची बहिण सौ. दिपमाला हिला आरोपी पतीने शारीरिक व मानसिक त्रास दिला असे फिर्यादीचे बयाण व डॉक्टरी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– प्रभात दिनकराव झोडे, वय 44 वर्ष, रा. प्लॉट क्र. 14 शिक्षक कॉलनी उमरेड चे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 498 (अ), 325 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास महिला सहायक पोलीस निरीक्षक शितल खोब्रगडे या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर